Civil Services (Main)
Examination- 2025

**SLPM-U-MRTH**

# मराठी / MARATHI

## प्रश्न-पत्र I / Paper I

## (साहित्य) / (LITERATURE)

| | |
|---|---|
| वेळ : **तीन** तास | कमाल अंक : **250** |
| *Time Allowed :* ***Three*** *Hours* | *Maximum Marks :* **250** |

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

***उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात :***

*__आठ__ प्रश्नांची विभागणी __दोन भागांमध्ये__ केलेली आहे.*

*उमेदवाराला एकूण __पाच__ प्रश्न सोडवावयाचे आहेत.*

*प्रश्न क्रमांक __1__ आणि __5__ हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी __तीन__ प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान __एक__ तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*प्रश्न / भागाने घेतलेल्या गुणांची संख्या त्याच्या विरुद्ध दर्शविली जाते.*

*__मराठीतच__ उत्तरे लिहावीत.*

*ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.*

*प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.*

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are __EIGHT__ questions divided in __TWO SECTIONS.__*

*Candidate has to attempt __FIVE__ questions in all.*

*Questions no. __1__ and __5__ are compulsory and out of the remaining, __THREE__ are to be attempted choosing at least __ONE__ question from each section.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in __MARATHI__.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

## SECTION A

**Q1.** **पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :** *10×5=50*

(a) 'भाषा ही ध्वनिरूप चिह्नव्यवस्था असते.' या विधानाची सार्थकता पटवून द्या. *10*

(b) 'शब्दशक्ती' ची संकल्पना स्पष्ट करा. *10*

(c) प्रमाण भाषा म्हणजे काय ते सांगून प्रमाण भाषेचे महत्त्व विशद करा. *10*

(d) प्रयोग म्हणजे काय ? ते सांगून कर्मणी प्रयोगाचा परिचय करून द्या. *10*

(e) लोकनाट्यांच्या परंपरेत 'दंढार' या लोकनाट्याचे वेगळेपण विशद करा. *10*

**Q2.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) भाषेची लक्षणे विशद करा. *20*

(b) मराठीतील विविध बोली कोणत्या ते सांगून बोलींचे सामाजिक व वाङ्मयीन महत्त्व विशद करा. *15*

(c) मराठी लोकगीतांमधून प्रगट होणाऱ्या. स्त्रीमनाच्या भावविश्वाचे चित्रण करा. *15*

**Q3.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) लोकरंगभूमीची संकेतव्यवस्था साधार स्पष्ट करा. *20*

(b) 'डेल हाईम्स' ची 'संदेशवहनात्मकक्षमता' (Communicative competence) चे स्वरूप स्पष्ट करा. *15*

(c) विभक्तीचे प्रकार सांगून द्वितीया व चतुर्थी या विभक्तींचे प्रत्ययार्थासह विवरण करा. *15*

**Q4.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) अभ्यस्त शब्द म्हणजे काय ते सांगून अभ्यस्त शब्दाच्या प्रकारांचा परामर्श घ्या. *20*

(b) डांगी ही मराठीची बोली की गुजराथीची बोली यासंदर्भात झालेल्या वादाची साधार मीमांसा करा. *15*

(c) यादवकालीन मराठी भाषेची वैशिष्ट्ये सोदाहरण विशद करा. *15*

## SECTION B

**Q5.** **पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :** *10×5=50*

(a) 'श्रीगोविंदप्रभुचरित्रा'च्या आधारे म्हाइंभटांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये साधार लिहा. *10*

(b) मोरोपंतांच्या 'श्लोककेकावली' चे वेगळेपण सांगा. *10*

(c) आधुनिकतावाद म्हणजे काय ते सांगून, साहित्याशी त्याचा अनुबंध स्पष्ट करा. *10*

(d) समाजशास्त्रीय समीक्षापद्धतीच्या मर्यादा स्पष्ट करा. *10*

(e) चळवळींचा साहित्यनिर्मितीवर कसा परिणाम होतो, ते स्त्रीवादी साहित्याच्या आधारे स्पष्ट करा. *10*

**Q6.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) "संत तुकारामांची कविता म्हणजे सामाजिक दांभिकतेवर चालवलेले एक उत्तम शस्त्र आहे" – या विधानाची साधकबाधक चर्चा करा. *20*

(b) शैलीवैज्ञानिक समीक्षा साहित्याचे योग्य मूल्यमापन करण्यास सक्षम आहे का ? साधार चिकित्सा करा. *15*

(c) प्रबोधन कालखंडातील मराठी नाट्यवाङ्मयाच्या कामगिरीचे यथायोग्य मूल्यमापन करा. *15*

**Q7.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) शाहिरी कवितेची परंपरा विशद करून शाहीर रामजोशी यांच्या लावणीवाङ्मयाची वैशिष्ट्ये नमूद करा. *20*

(b) 'बखर वाङ्मय' हे इतिहासाचे अधिकृत साधन ठरू शकते का ? – साधकबाधक चर्चा करा. *15*

(c) साहित्य समीक्षेतील आस्वाद, आकलन आणि मूल्यमापन ही त्रिसूत्री स्पष्ट करा. *15*

**Q8.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) साहित्यनिर्मितीमागील विविध प्रेरणा स्पष्ट करा. *20*

(b) नवकवितेच्या पार्श्वभूमीवर बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितेचे विश्लेषण करा. *15*

(c) मराठीतील पौराणिक कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये सोदाहरण लिहा. *15*